नगरपरिषद प्रशासन संचालनालय
७वा मजला, बेलापूर भवन, नवी मुंबई महानगरपालिका इमारत,
सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई – ४००६१४

नपप्रसं २०२५/ वैशिष्ट्यपूर्ण विशेष अनुदान /प्र.क्र./कक्ष-७/6614 दिनांक- 11 SEP 2025

**वाचा:-** १)नगर विकास, शासन निर्णय क्र-संकिर्ण-२०२५/प्र.क्र.७६(भाग-२)नवी-१६,दि. २८ मार्च, २०२५.
२)नगर विकास, शासन निर्णय क्र-संकिर्ण-२०२५/प्र.क्र.७६(भाग-२)नवी-१६,दि.४ एप्रिल, २०२५.
३) शासन निर्णय क्रमांक:- नपावै -२०२३/प्र.क्र.५०९/नवि-१६(ई-६६३६९०) दि.३ सप्टेंबर, २०२५.
४) शासन निर्णय क्रमांक:- नपावै -२०२३/प्र.क्र.५०९(१)/नवि-१६(ई-६६३६९०) दि.३ सप्टेंबर, २०२५.

**राज्यातील नगरपरिषद/नगरपंचायत यांना सन २०२४-२०२५ साठी "नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान" योजनेअंतर्गत निधी वितरीत करण्याबाबत. लेखाशीर्ष (४२१७ ०६०३) रक्कम रु.१२,००,००,०००/- (रुपये बारा कोटी फक्त)निधी वितरण आदेश क्र.१०.**

नगर विकास, शासन निर्णय संदर्भ क्र-१ व २ अन्वये सन २०२४-२०२५ या वित्तीय वर्षासाठी नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत (४२१७ ०६०३ ) राज्यातील नगरपरिषद / नगरपंचायती यांना शासनाने वेळोवेळी आदेशीत केल्यानुसार निधी वितरीत करण्याकरिता संचालनालयास निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच सदर निधी हा वित्त विभाग ,शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय,दिनांक-६ जून,२००८ मधील तरतुदीप्रमाणे खर्च करणे बंधनकारक राहील असे संदर्भ क्र.३ व ४ च्या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आलेले आहे.

त्यानुषंगाने नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत (४२१७ ०६०३ ) अंतर्गत उपरोक्त वाचा मधील शासन निर्णय क्र. ३ व ४ अन्वये **रक्कम रु.१२,००,००,०००/- (रुपये बारा कोटी फक्त)** इतका निधी मंजूर करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने वाचा मधील शासन निर्णय क्र.३ अन्वये निधी वितरीत करण्यात येत आहे. सोबत नमूद करण्यात आलेल्या विवरण पत्रातील परिशिष्ट "अ"मध्ये नमूद करण्यात आलेल्या जिल्हाधिकारी /जिल्हा प्रशासन अधिकारी (संबंधित), जिल्हाधिकारी कार्यालय यांना नगरविकास विभाग नवि-१६ कडील शासन निर्णयाद्वारे वितरीत करण्याचे आदेशीत केलेनुसार संबंधितांनी कळविलेल्या त्यांच्या बँक खातेवर निधी वितरीत करण्यात येत आहे.

**परिशिष्ट-अ**

**आदेश क्र.१०**

**सन २०२४-२५ आर्थिक वर्षाकरिता नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान योजना लेखाशीर्ष (४२१७०६०३) अंतर्गत निधी वितरण.**

| अ.क्र. | जिल्हा | स्थानिक स्वराज्य संस्था | निधी वर्ग करण्यात आलेले कार्यालय | आदेश क्रमांक व दिनांक | रक्कम (आकडे रुपयात) | रक्कम (आकडे अक्षरात) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **शासन निर्णय क्रमांक:- नपावै -२०२३/प्र.क्र.५०९/नवि-१६(ई-६६३६९०) दि.३ सप्टेंबर, २०२५ अन्वये निधी वितरण** | | | | | | |
| १ | कोल्हापूर | हातकणंगले | जिल्हाधिकारी/ जिल्हा प्रशासन अधिकारी,कोल्हापूर | नपावै-२०२४/ प्र.क्र.२४६(ब -१)/नवि - १६(८२८२६९)दिनांक- ८.१०.२०२४ | 3,00,00,000.00 | रुपये तीन कोटी फक्त |
| २ | कोल्हापूर | हुपरी | जिल्हाधिकारी/ जिल्हा प्रशासन अधिकारी,कोल्हापूर | नपावै-२०२४/ प्र.क्र.२४६(क -६४)/नवि -१६(८२८२६९)दिनांक- १५.१०.२०२४ | 3,00,00,000.00 | रुपये तीन कोटी फक्त |
| **एकूण रुक्कम रु.(अ)** | | | | | 6,00,00,000.00 | **रुपये सहा कोटी फक्त** |
| **शासन निर्णय क्रमांक:- नपावै -२०२३/प्र.क्र.५०९(१)/नवि-१६(ई-६६३६९०) दि.३ सप्टेंबर, २०२५ अन्वये निधी वितरण** | | | | | | |
| ३ | धाराशिव | उमरगा | जिल्हाधिकारी/ जिल्हा प्रशासन अधिकारी,धाराशिव | नपावै-२०२४/ प्र.क्र.२२५(२७)/नवि - १६(८१८८५६)दिनांक- १६.०९.२०२४ | 6,00,00,000.00 | **रुपये सहा कोटी फक्त** |
| **एकूण रुक्कम रु.(ब)** | | | | | 6,00,00,000.00 | **रुपये सहा कोटी फक्त** |
| **एकूण रुक्कम रु.(अ)+(ब)** | | | | | 12,00,00,000.00 | **रुपये बारा कोटी** |

शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील विहित केलेल्या कार्यपद्धती, सर्व अटी व शर्ती लागू राहतील. त्यांचे काटेकोरपणे पालन करून जिल्हा सह आयुक्त व महानगरपालिका यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा. तसेच, वितरीत करण्यात आलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र संबधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्यात यावे व सदर उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत संचालानालायास सादर करण्यात यावी.

सदर निधी खात्यात जमा झाल्यानंतर, ७ दिवसात निधी प्राप्त झाल्याची पोहोच संचालनालयास सादर करावी. आपली पोहोच प्राप्त न झाल्यास संचालनालय आदेशान्वये आपले कार्यालयास निधी प्राप्त झाला आहे असे ग्राह्य धरण्यात येईल.

मा. आयुक्त तथा संचालक, न.प.प्र.सं. यांच्या मान्यतेने.

(संजय काकडे )
सह आयुक्त
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई

प्रत-

१. प्रधान सचिव, नगरविकास विभाग -१६, मंत्रालय, मुंबई -३२.
२. संबंधित जिल्हाधिकारी / जिल्हा प्रशासन अधिकारी , जिल्हाधिकारी कार्यालय.
३. संबंधित विभागीय सह आयुक्त, विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक कार्यालय.
४. संबंधित मुख्याधिकारी, नगरपरिषद.